MHBI110002572026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६५/२०२६ मधील नि.१ वरील आदेश

मुक्तार शेख व इतर-४ वि. कोणी नाही...

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर केला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे -

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ चे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे वजीर पि. कारभारी शेख हे दि.२६/०७/२०१६ रोजी मौजे महांडुळा, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत. मयत वजीर पि. कारभारी शेख यांचे आई वडील हे पुर्वीच मयत झालेले आहेत. मयत वजीर पि. कारभारी शेख यांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यांचे मृत्यूनंतर शासकीय तथा निमशासकीय कामकाजाकरिता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दि.२९/०१/२०२६ रोजीचे 'दैनिक बीड संकेत' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली. सदर वर्तमानपत्राची प्रत नि.१० वर दाखल आहे. मयत वजीर पि. कारभारी शेख यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत नि.६ वर दाखल केले आहे.

४. उपरोक्त वर्तमानपत्रामधील नोटीसीद्वारे जाहीर प्रगटन काढून सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत वजीर पि. कारभारी शेख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप मागविणेत आले. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५. अर्जदार यांनी अर्जामधील कथनांच्या पुष्ठ्यर्थ अर्जदार क्र.३ याचे नि.११ कडे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. मुळतःच अर्जास कोणीही आक्षेप घेतलेला नसल्याने त्यांचा सरतपास अबाधीत राहीला आहे. शपथपत्रातील कथने खोटी आढळल्यास त्याबाबतच्या शिक्षेस ते पात्र राहतील.

६. उपरोक्त विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार हे मयत वजीर पि. कारभारी शेख यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

<u>आ दे श</u>

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत वजीर पि. कारभारी शेख यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३) नियमाप्रमाणे कोर्ट फी भरल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ५ यांचे नावे विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

MOMIN HANIF MOINUDDIN

Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2026.03.12 13:21:44 +0530

दिनांक : १२/०३/२०२६

**( एच.एम. मोमीन )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गेवराई.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 12-03-2026 |
| Transcribed on | :- | 12-03-2026 |
| Checked & Signed on | :- | 12-03-2026 |

Sd/-
(A.K.Joshi)
Jr.Clerk, Georai.